परिपत्रक

विषय- कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांना <u>महाकृषि संचार भाग – २ (मोबाईल CUG सेवा)</u> उपलब्ध करुन देणे बाबत.....

कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी हे क्षेत्रिय पातळीपर्यंत कार्यरत आहेत. त्यांच्याशी सध्याच्या पध्दतीनुसार संपर्क करणे खुप अडचणीचे व खर्चिक आहे. क्षेत्रीय पातळीवरील अधिकारी व कर्मचारी यांचेशी कमी खर्चात व सवलतीच्या दरात संपर्क साधणे सोईचे व्हावे, ही बाब विचाराधीन होती. तसेच राज्यातील सर्व संपर्क शेतकरी, पुरस्कार प्राप्त शेतकरी, गट शेती करणारे शेतकरी व समुह शेती करणारे शेतकरी यांच्याशी कृषि विभागाच्या अधिका-यांनी सात्यत्याने संपर्कात रहाणे गरजेचे आहे. तसेच शेतक-यांना कृषि हवामान विषयक सल्ला, खते, बी-बियाणे यांची उपलब्धता व गुणवत्ता इत्यादी बाबत असणा-या अडचणी व कृषि विभागाच्या योजना इत्यादींची माहीतसाठी तात्काळ व कमी खर्चात देणे सोयीचे व्हावे तसेच शेतकर्यांनी कृषी व संलग्न विभागाशी संपर्क साधणे सोपे व कमी खर्चाचे व्हावे, ही बाब लक्षात घेवून **"भारत संचार निगम लि." (BSNL)** यांचेबरोबर सामंजस्य करार करून **"महाकृषी संचार" मोबाईल CUG सेवा** उपलब्ध करुन करून देण्यात आली आहे.

"महाकृषी संचार" मोबाईल CUG सेवा अंतर्गत एकुण ७ लाख पन्नास हजार अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी यांना सेवा देण्यात येवून BSNL यांनी तांत्रिक कारणा मुळे नवीन नोंदणी बंद केली होती.

महाकृषी संचार CUG Plan बाबत भारत संचार निगम लिमिटेड व कृषी विभागाकडे शेतक-यांचा CUG योजना पुन्हा नव्याने सुरु करणे बाबत सातत्याने विचारणा होत होती. त्यानूसार BSNL च्या अधिका-यांची बैठक घेवून भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांना नव्याने महाकृषी संचार (CUG मोबाईल सेवा) बाबत Plan सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्यात. त्यानुसार (BSNL) यांनी Prepaid सेवा आणि Postpaid सेवा असे दोन Plan सादर केले. दोन्ही सादर केलेल्या Plan चे दर हे पुर्वी च्या महाकृषी संचार या उपक्रमाच्या दरा एवढेच आहेत. तथापि या प्लॅन मध्ये उपलब्ध सुविधांमध्ये बदल केलेला आहे.

या अंतर्गत <u>भारत संचार निगम लिमिटेड कडून शेतक-यांसाठी फक्त Prepaid CUG Plan ची सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.</u> कृषी खात्यातील अधिकारी/कर्मचारी आणि विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि त्यांच्या कुटुंबीयांना Prepaid आणि Postpaid असे दोन्ही प्लॅन उपलब्ध करण्यात येत आहेत. मंत्रालयातील अधिकारी/कर्मचारी सुद्धा या उपक्रमात सहभागी होऊ शकतील.

नवीन सेवेस महाकृषी संचार - २ (CUG मोबाईल सेवा) असे संबोधण्यात येणार आहे.

http://mahaagri.gov.in/

<u>महाकृषी संचार व महाकृषी संचार – २ यांच्यामधील सदस्यांच्या भ्रमणध्वनी व संपर्क सुविधा विनामुल्य असतील.</u>

CUG उपक्रमा मध्ये शेतकरी, शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी यांना संपुर्ण राज्यात एकमेकांशी भ्रमणध्वनी द्वारे मोफत संपर्क साधता येईल. तसेच त्यांचे कुटूंबातील व्यक्तींना या उपक्रमात सहभागी होता येईल. **या उपक्रमा म धील सहभाग ऐच्छिक आहे** . "भारत संचार निगम लि." (BSNL) दिलेले दर, विनामुल्य सुविधा इत्यादीबाबत त्यांनी आयुक्तालयास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत सोबत माहितीस्तव जोडली आहे.
या मधील प्रमुख बाबी पुढील प्रमाणे आहेत.

पोस्टपेड प्लान
मासिक भाडे- रू ९८.००,
सीयुजी अंतर्गत सर्व कॉल मोफत,
सीयुजी व्यतिरिक्त इतर नेटवर्क कॉल २०० मिनीट व बीएसएनएल नेटवर्क ३०० मिनीट मोफत, ४०० एसएमएस मोफत व एक ०.२ GB मर्यादेपर्यंत GPRS download मोफत. सेवाकर अतिरिक्त. (सविस्तर उपलब्ध सुविधांसाठी, शुल्काच्या तपशीलासाठी सोबत जोडलेला प्लान बघावा)

प्रीपेड प्लान-
किमान मासिक रिचार्ज- रु १०८
सीयुजी अंतर्गत सर्व कॉल मोफत,
सीयुजी व्यतिरिक्त इतर नेटवर्क कॉल २०० मिनीट व बीएसएनएल नेटवर्क ३०० मिनीट मोफत, ४०० एसएमएस मोफत व एक ०.२ GB मर्यादेपर्यंत GPRS download मोफत. (सविस्तर उपलब्ध सुविधांसाठी, शुल्काच्या तपशीलासाठी सोबत जोडलेला प्लान बघावा)
बीएसएनएल कंपनीसोबत या उपक्रमा अंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

प्रमुख वैशिष्टये व करावयाची कार्यवाही
१. कृषि आयुक्तालयाची भुमिका फक्त कृषि विभागातील अधिकारी/कर्मचारी व शेतकरी यांना विशेष सवलतीचे दरात भ्रमणध्वनी व सीयुजी सुविधा उपलब्ध करुन देणे यासाठी facilitator म्हणून मर्यादीत राहील.
२. या उपक्रमा अंतर्गत सहभागी होणारे अधिकारी/कर्मचारी/कुटूंबातील व्यक्तीं व शेतक-यांनी ही सेवा स्विकारल्यानंतर त्याबाबतचे सर्व देयक त्यांनीच भरावयाचे आहे. अर्जा सोबत कंपनीने निश्चित केलेली रक्कम जमा करावयाचे आहेत. ही रक्कम पहिला देयकामध्ये समायोजित करण्यात येईल.
३. भ्रमणध्वनी सेवा घेण्यासाठी व कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक असणारे ओळख पत्र/ ओळखीचा पुरावा, रहिवाशी बाबतचा पुरावा व फोटो हे स्वत: या उपक्रमा मध्ये सहभागी होणा-या व्यक्तीने उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

http://mahaagri.gov.in/

४. भ्रमणध्वनी देयकाच्या वसूलीची जबाबदारी कृषि आयुक्तालयाची अथवा कृषि विभागातील कोणत्याही कार्यालयाची असणार नाही.

५. बीएसएनएल कंपनीचे भ्रमणध्वनी क्रमांक जर अगोदरच अधिकारी/कर्मचारी व शेतकरी यांचेकडे असतील तर त्यांना पुन्हा नवीन क्रमांक घेण्याची आवश्यकता नाही, असे क्रमांक या योजनेत समाविष्ठ होवु शकतील. फक्त प्रिपेड प्लॅनचे सिम कार्ड बदलेल. बीएसएनएला तसा अर्ज करणे आवश्यक आहे.

६. वि.कृ.स.सं, जि.अ.कृ.अ, उ.वि.कृअ व ता.कृ.अ यांनी या उपक्रमासाठी समन्वयक अधिका-याची (शक्यतो संगणक समन्वयक) नेमणुक करावी. या अधिका-याने स्थानिक बीएसएनएल कंपनीच्या अधिका-यांशी संर्पक साधावा व नियोजन करावे.

७. या सुविधे संबधी बीएसएनएल कंपनीचे प्रतिनिधी आपल्या कार्यालयाशी संपर्क करतील तेव्हा त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, त्यांना सभेच्यावेळी आमंत्रित करुन हा उपक्रम सर्व अधिकारी/ कर्मचारी व शेतकरी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावा. या उपक्रमाचा जास्तीत जास्त अधिकारी/कर्मचारी व शेतक-यांना स्वइच्छेने लाभ घेण्यासाठी कळवावे. कृषि विद्यापीठ , कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र व कृषी विभागाशी संलग्न कार्यालयातील अधिकारी/कर्मचा-यांनाही या उपक्रमात सहभागी करून घ्यावे.

८. राज्यात सर्वदूर या योजनेचा लाभ शेतक-यांना घेता यावा या दृष्टीने भारत संचार निगम लिमिटेड**(BSNL)** यांच्या मुलभुत सुविधा विचारात घेवून सर्व जिल्ह्यांना समान ५०००/- कनेक्शनचा लक्ष्यांक देण्यात येत आहे. सदरचा प्रकल्प एकूण १.६५ लक्ष सभासद किंवा ३० सप्टेंबर २०१२ (जे प्रथम घडेल) या मर्यादेत राबविण्यात येणार.

९. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी या उपक्रमात सहभागी अधिकारी व कर्मचारी यांची माहिती खालील तक्त्यात इंग्रजी भाषेमध्ये Excel Form मध्ये भरुन **ddproject@rediffmail.com** यांना पाठवावी.

Sr. No.	Name of Staff	Designation	Name of Office	District	Taluka	Mobile no.	Can view Marathi font (Yes/No)

१०. महाकृषी संचार-२ (CUG मोबाईल सेवा) सभासद करण्यात येणा-या शेतक-यांची कृषी विषयक सल्ला सेवेसाठी सहमती घेणे व त्या बाबतचा विहीत डाटा बेस कृषी विभागास देणे वंधनकारक करण्यात येत आहे. **याकरिता तालुका कृषी अधिकारी यांनी शेतकर्यां ना सभासत्वाकरिता संमतीपत्र /प्रमाणपत्र देताना महाकृषी एस. एम.एस सेवेत नोंदणी करणेकरीता सहम ती अर्ज भरून घेण्यात यावा.**

११. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी या उपक्रमात सहभागी होणा-या शेतक-यांची माहीती खालील तक्त्यात Excel file (ARIAL FONT) इंग्रजीमध्ये ddproject@rediffmail.com या e-mail

http://mahaagri.gov.in/

पत्यावर पाठवावी. फाइल नाव पुढील प्रमाणे असावे- (Farmer Registration list for aaa Taluka bbb District date11-02-2012). म्हणजे Mahaagrisms या सुविधेत शेतक-यांची नोंदणी सुलभ होईल.

Sr. No.	Name of Farmer	Village	Taluka	District	Mobile no.	Can view Marathi font (Yes/No)	Crops 1 to 8
1	2	3	4	5	6	7	8

१२. महाकृषि संचार सेवेच्या माध्यमातून प्रभावी कृषि विस्ताराकरीता या कार्यालयाचे परीपत्रक जा.क्र/सं.प्र/सीयुजी/परीपत्रक/१८३/२०११ दिनांक १९/०९/२०११. दिलेल्या सूचनानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

- तालुका स्तरावर सीयुजी सभासदांचे पिक निहाय गट तयार करण्यात यावेत.
- या शेतकर्यांवना पिक विषयी, योजनांविषयी आवश्यकतेनुसार मार्गदर्शन घेण्याकरीता कृषि विभागातंर्गत, कृषि विद्यापिठातंर्गत पिकनिहाय तज्ञांची निवड करण्यात यावी.
- या तज्ञांचा मोबाईल नंबर स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावा.
- त्याच प्रमाणे संबंधीत तज्ञांचा मोबाईल नंबर कार्यक्षेत्रातील सर्व सीयुजी सभासदांना महाकृषि एसएमएस सेवेव्दारे पाठविण्यात यावेत.
- याप्रमाणे प्रत्येक तालुक्यात किमान पाच गट व पाच तज्ञांची निवड करण्यात यावी.
- जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर या संदर्भातील तज्ञांचा तपशील प्राप्त करुन जिल्हास्तरावरुन पुनःश्च वृत्तपत्रातून प्रसिध्द करावा.

१३. महाकृषी संचार २ अंतर्गत नूतन सभासदांना तांत्रिक माहिती जाणून घेणेसाठी उपयुक्त दूरध्वनी क्रमांक कळवायचे आहेत. याअनुषंगाने, सहपत्रित दूरध्वनी क्रमांक शेतकर्यांनाकळविण्यात यावेत.

१४. तालुका कृषी अधिकारी यांनी या उपक्रमात जास्तीत जास्त शेतकर्यां नी स्वेच्छेने सहभागी होण्यासाठी माहिती द्यावी. तालुका कृषी अधिकारी यांनी शेतकर्यां ची यादी शिफारस करावी.

स्वाक्षरीत-

आयुक्त कृषि,

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

http://mahaagri.gov.in/

संपर्क

कृषी विभाग

१. श्री. उदय अ. देशमुख,
कृषी उपसंचालक(प्रकल्प)
कृषि आयुक्तालय, पुणे
फोन ०२०-२५५११४७९

२. श्री. अशोक. भि. पाटील,
तंत्र अधिकारी,
कृषि आयुक्तालय, पुणे
फोन ०२०-२५५११४७९
मो. ९८२२९९७७०३

बीएसएनएल

१. श्री. जी. के. पाटिल
ए.जी.एम (ईबी)
बीएसएनएल, शिवजीनगर एक्सचेंज, पुणे
फोन ०२०- २६१२२३२३/२३२५
मो.९४२२०८८५००

२. श्री. ए. के. अवस्थी,
मॅनेजर(ई.बी.)
बीएसएनएल, शिवजीनगर एक्सचेंज, पुणे
फोन ०२०- २६१२२३२३/२३२५
मो. ९४०४२४०२६५

क्रं.कृषिआयु/फलो-७/प्रकल्प/भ्रमणध्वनी/७८/२०१२,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे४११ ००५
दिनांक : ३१मार्च, २०१२.

माहितीस्तव सविनय सादर.

१. मा.प्रधान सचिव,कृषि व फलोत्पादन,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई ३२.

प्रतिलिपी : माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित/रवाना.

१. संचालक, ---------- (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक,विस्तार शिक्षण,कृषि विद्यापीठ(सर्व)
३. कृषि सह-संचालक(आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. विभागीय कृषि सह-संचालक, ---------- (सर्व)
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ---------- (सर्व)
६. उप-विभागीय कृषि अधिकारी, ---------- (सर्व)
७. तालुका कृषि अधिकारी, ---------- (सर्व)
८. महा व्यवस्थापक (ईबी) भारत संचार निगम लि., पुणे.

http://mahaagri.gov.in/